

विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ३e३३ /म.वि.स./ ई-2
दिनांक ७ मार्च, २०२५

**प्रेषक :**

**निवडणूक निर्णय अधिकारी,**
विधानपरिषद पोट निवडणूक, २०२५

**प्रति :**

**सर्व सन्मा. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य/**
**सर्व सन्मा.महाराष्ट्र विधानसभा सदस्य.**

**विषय :- विधानपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या पाच स्वतंत्र पोट निवडणूकींकरीता प्रस्थापित करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाबाबत.**

**महोदय/महोदया,**

सन २०२५ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांद्वारे घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पाच स्वतंत्र पोट निवडणूकींचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. सदर निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक १० मार्च, २०२५ पासून ते निवडणूकींची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२ येथे **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात आला आहे.

आपला,

**(उमेश शरद शिंदे)**
**उप सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व
सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

# Bye Election to the Maharashtra Legislative Council, 2025

The Election Commission of India has declared a programme of Five Separate Bye Elections to the Maharashtra Legislative Council by the members of the Maharashtra Legislative Assembly to fill the vacancies caused by the election of Amashya Fulaji Padvi, Pravin Prabhakarrao Datke, Rajesh Uttamrao Vitekar, Ramesh Kashiram Karad, Gopichand Kundalik Padalkar members of the Maharashtra Legislative Council to the Maharashtra Legislative Assembly. Accordingly, the said programme of Bye Elections is to commence from 10th March, 2025 and the last date of making nominations is 17th March, 2025. Also, the poll, if required, will be taken on 27th March, 2025.

In pursuance of the directions issued by the Election Commission of India, a 24x7 Control Room has been put into operation at **Room No. 801, Eighth Floor, Vidhan Bhavan, Mumbai – 400032 from 10th March, 2025** till the completion of the electoral process in order to attend all complaints submitted by people with regard to but not restricted to undue influence by offering cash or kind to a voter with a view to getting his/her vote, any type of threats, coercion to voters in the free exercise of franchise, misuse of the state machinery for electoral gains, partisan attitude or unbecoming conduct of connected election officers/police officers adversely affecting the fairness of poll etc. Whoever wishes to submit a complaint in respect of the said elections may submit the same in the aforementioned control room.

**(Jitendra Bhole)**
**Secretary(1)(In-Charge),**
**Maharashtra Legislature Secretariat**
**and**
**Returning Officer**

# विधानपरिषद पोट निवडणूक, २०२५

विधानपरिषदेचे सदस्य आमश्या फुलजी पाडवी, प्रविण प्रभाकरराव दटके, राजेश उत्तमराव विटेकर, रमेश काशिराम कराड, गोपिचंद पडळकर हे विधानसभेवर निवडून गेल्यामुळे विधानपरिषदेवरील रिक्त झालेल्या जागा भरण्याकरिता महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांद्वारे घेण्यात येणाऱ्या विधानपरिषदेच्या पाच स्वतंत्र पोट निवडणूकींचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगामार्फत घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार पोट निवडणूकींचा कार्यक्रम दिनांक १० मार्च, २०२५ पासून सुरु होत असून नामनिर्देशन पत्र सादर करावयाची मुदत दिनांक १७ मार्च, २०२५ पर्यंत आहे व आवश्यक असल्यास दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

या निवडणूकींमध्ये मतदाराचे मत मिळविण्याच्या दृष्टीने त्याला रोख रक्कम किंवा वस्तू देऊन अनुचित प्रभाव निर्माण करणे, मुक्तपणे मताधिकार वापरताना मतदारांना कोणत्याही प्रकारच्या धमक्या देणे, जबरदस्ती करणे, मतदानामध्ये फायद्यासाठी राज्य यंत्रणेचा गैरवापर करणे, संबंधित मतदान अधिकारी/पोलीस अधिकारी यांची पक्षपाती वृत्ती किंवा अयोग्य वागणूक यांचा मतदानाच्या योग्यतेवर होणारा प्रतिकूल परिणाम इत्यादीसंदर्भात जनतेच्या तक्रारींकरीता भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार, उपरोक्त निवडणूकींची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक १० मार्च, २०२५ पासून ते निवडणूकींची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, **कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२** येथे २४ X ७ तत्वावर **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात आला आहे. ज्या कोणास या निवडणूकींसंदर्भात तक्रार सादर करावयाची असेल त्यांनी उपरोक्त नियंत्रण कक्षात करावी.

**(जितेंद्र भोळे)**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**व**
**निवडणूक निर्णय अधिकारी**